दैनिक
# अट्टल संकेत
ATTAL SANKET
Email : attalsanket2023@gmail.com
RNI No. MAHMAR/2023/87816
■ दैनिक ■ छत्रपती संभाजीनगर ■ वर्ष-३ ■ अंक-७३ ■ शुक्रवार, दि. २ मे २०२५ ■ पाने ४ ■ किंमत २ रूपये
■ Daily ■ Chhatrapati sambhajinagar ■ Vol.3 ■ Issue -73 ■ Friday, 1 May 2025 ■ Pages-4 ■ Price- 2/-

## ‘कोणालाही सोडणार नाही, शोधून काढणार आणि वेचून मारणार’

### केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचा पाकिस्तानला सज्जड दम

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

पहलगाममध्ये हल्ला करणाऱ्यांना वाटत असेल की ते जिंकले तर तो त्यांचा भ्रम आहे. त्यांना शोधून काढून आणि वेचून मारू. हा नरेंद्र मोदींचा भारत आहे. एक - एक करुन बदला घेतला जाईल; असे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह म्हणाले. ते दिल्लीत एका सार्वजनिक सभेत बोलत होते. पहलगाम अतिरेकी हल्ल्यानंतर पहिल्यांदाच सार्वजनिक सभेत बोलताना केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी दहशतवादी आणि त्यांना मदत देणाऱ्या पाकिस्तानला सज्जड दम दिला.

पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली, मग ते ईशान्य भारत असो, डाव्या विचारसरणीच्या अतिरेक्यांचा प्रदेश असो किंवा काश्मीरमधील दहशतवाद असो आम्ही प्रत्येकाला प्रत्युत्तर देत आहोत. जर कोणाला वाटत असेल



की हल्ला केला आणि ते जिंकले तर तो त्यांचा भ्रम आहे. त्यांना शोधून काढून आणि वेचून मारू. हा नरेंद्र मोदींचा भारत आहे. एक - एक करुन बदला घेतला जाईल. कोणालाही सोडले जाणार नाही; असे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह म्हणाले. दहशतवाद संपेपर्यंत लढा सुरू राहील. ज्यांनी पहलगाममध्ये नागरिकांची हत्या केली त्यांना शिक्षा होईल. परिणाम भोगावेच लागतील, असा इशारा केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी दिला. काश्मीरमध्ये ९० च्या दशकापासून दहशतवाद आहे. पण मोदी सरकार दहशतवादाच्या विरोधात शून्य सहनशीलतेचे धोरण राबवत आहे.

नागरिकांचे प्राण घेणाऱ्यांना परिणाम भोगावे लागतील. दहशतवादाविरुद्धची लढाई म्हणजे मोठ्या प्रवासातील एक टप्पा आहे. प्रत्येकाला योग्य वेळी योग्य पद्धतीने उत्तर दिले जाईल; असे अमित शाह यांनी सांगितले. देशाच्या कानाकोपऱ्यातून दहशतवादाचा बीमोड केला जाईल, असेही अमित शाह म्हणाले. दहशतवादाच्या विरोधात लढण्यासाठी भारताला आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक देशांचा पाठिंबा मिळत असल्याचे गृहमंत्री अमित शाह यांनी सांगितले. संपूर्ण जग भारताच्या बाजूने उभे आहे. दहशतवादाला तोंड देण्यासाठी जगातील अनेक देश एकत्र येत असून ते भारताच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहत आहेत; असे अमित शाह म्हणाले.

याआधी जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी अतिरेकी हल्ल्यात २५ पर्यटक आणि एक स्थानिक अशा २६ जणांचा मृत्यू झाला होता.

या घटनेनंतर केंद्राकडून तातडीने अमित शाह जम्मू काश्मीरमध्ये पोहोचले होते. त्यांनी पहलगाम येथील हल्ल्याच्या ठिकाणी पाहणी करून परिस्थितीचा आढावा घेतला. तसेच मृतांना श्रद्धांजली वाहताना दहशतवाद्यांना धडा शिकविणार असल्याचे जाहीर केले होते.

## अयोध्येचं राम मंदिर सोन्याने मढवणार! मुख्य कलशासह सिंहासनावर लावणार सोने

**अयोध्या (वृत्तसंस्था)**

वर्षभरापूर्वी राम मंदिराच्या तळमजल्यावरील १४ दरवाज्यांवर सोने बसवण्यात आले होते. प्रत्येक दरवाजावर सुमारे ३ किलो सोने वापरले गेले आहे. त्यानंतर यंदा जून महिन्यात राम दरबाराचा अभिषेक करण्यात येणार असून मंदिर प्रशासन ३ दिवस हा उत्सव साजरा करण्याची तयारी करत आहे. या पार्श्वभूमीवर ट्रस्टने मंदिराचे काम हाती घेतले आहे. प्रभू श्री रामाचं सिंहासन आणि त्यांचं द्वार सोन्याचं असावं, अशी भाविकांची इच्छा असल्याने श्री रामजन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टने राम मंदिर संपूर्णत: सोन्याने मढवणार असल्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.

मंदिर ट्रस्टने दिलेल्या माहितीनुसार, राम मंदिराच्या दरवाज्यांवर सोन्याचा मुलामा लावण्याचे काम पुन्हा सुरू झाले आहे. आता पहिल्या मजल्याच्या ६ दरवाज्यांवर १८ किलो सोन्याचा मुलामा चढवला जात आहे. प्रत्येक दरवाजावर ३ किलो सोने वापरले जाईल. मुख्य कलश आणि राम दरबाराच्या सिंहासनावरही सोने लावले जाईल. त्यावर ३ ते ४ किलो सोन्याचा मुलामा चढवला जाईल, असे सांगण्यात आले आहे.

**सागवानी लाकडावर तांब्याच्या थरानंतर सोन्याचा थर** – राम मंदिराचे दरवाजे महाराष्ट्रातील चंद्रपूर येथून आणलेल्या सागवान लाकडापासून बनवले आहेत. त्यावर प्रथम तांब्याचा थर लावण्यात आला. आता सोन्याचा थर लावण्यात आला आहे. या दरवाज्यांवर दोन हत्ती कमळाच्या फुलांवर पाणी घालताना दिसतात. दरवाजाच्या दोन्ही बाजूला जय आणि विजयाची चिन्हे बनवलेली आहेत. गुरुवारी पहिल्या मजल्यावर दरवाजे बसवण्याचे काम सुरू



### ६ दरवाजांवर १८ किलो सोन्याचा मुलामा चढवण्याचे काम सुरु

करण्यात आले. राम मंदिराच्या ४ फूट कलशावर सोने चढवण्याची तयारी पूर्ण झाली आहे. हे काम पुढील ३ दिवसांत पूर्ण होईल.

**मंदिराच्या मुख्य शिखरावर ४२ फूट उंच ध्वजस्तंभ स्थापित** – यापूर्वी मंगळवारी, वैशाख तृतीयेच्या दिवशी, मंदिराच्या मुख्य शिखरावर ४२ फूट उंच ध्वजस्तंभ स्थापित करण्यात आला होता. त्यामुळे मंदिराची एकूण उंची आता २०३ फूट झाली आहे. सरचिटणीस चंपत राय म्हणाले की, एल अँड टी आणि टीसीएसच्या अभियांत्रिकी पथकाने ट्रॉली आणि दोन टॉवर क्रेनच्या मदतीने १६१ फूट उंच शिखरावर ध्वजस्तंभ उचलून बसवला. गुजरातच्या भरत भाई कंपनीने मंदिराच्या पावित्र्याला आणि भव्यतेला अनुसरून एका खास डिझाइनसह ध्वजस्तंभ तयार केला आहे.

## काँग्रेसने दहशतवाद्यांवर कारवाई करण्याची हिंमत दाखवली नाही; यामुळेच लाखो सैनिक शहीद झाले!

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा घणाघात

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

पहलगाम येथे झालेल्या हल्ल्यामुळे संपूर्ण जग हादरुन गेलं आहे. दहशतवाद्यांनी पर्यटकांवर केलेल्या गोळीबारात २६ जणांचा मृत्यू झाला असून 'दोषींना सोडणार नाही' असा इशारा पंतप्रधान नरेंद्र मोदींनी दिला आहे.

या हल्ल्यामुळे सर्वत्र खळबळ उडाली असून अनेक राजकीय नेत्यांसह अभिनेत्यांनी देखील प्रतिक्रीया मांडल्या आहेत. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही पहलगाम हल्ल्याबाबत वक्तव्य करत असताना काँग्रेसवर घणाघात केला आहे. पहलगाम हल्ल्यानंतर भारताकडून अॅक्शनवर रिॲक्शन केली जात आहे. मात्र, काँग्रेसने पाकिस्तानला योग्य उत्तर देण्याची कधीच हिंमत दाखवली नाही, अशी बोचरी टीका उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली आहे.

पहलगाम हल्ल्याबाबत एकनाथ शिंदे म्हणाले की, 'पहिल्यांदाच पंतप्रधान मोदींनी पाकिस्तानविरुद्ध सर्वात कठोर कारवाई केली. ॲक्शनवर रिॲक्शन दिली. उच्चायुक्तालयातून ५ जणांना काढून टाकले. सिंधू जल करार स्थगित केला. अटारी सीमा बंद केली. पाकिस्तानी नागरिकांना देश सोडून जाण्यास सांगितले. देशाचे रक्षण करणाऱ्या भारतीय सशस्त्र दलांना पूर्ण स्वातंत्र्य देण्यात आले, असे कधी घडले आहे का? पुलवामा हल्ल्यानंतर सर्जिकल स्ट्राईक कोणी केले? यावेळीही पाकिस्तानला योग्य उत्तर मिळेल.' सकाळी तिन्ही सैन्याच्या पथकांमध्ये बैठक झाली आणि त्यात कठोर निर्णय घेण्यात आला. पंतप्रधान मोदी पाकिस्तानचा पूर्णपणे नायनाट करून हिशोब चुकता करतील.' असे एकनाथ शिंदे यांनी म्हटले. त्याचबरोबर, काँग्रेसने पाकिस्तानला योग्य उत्तर देण्याची किंवा दहशतवाद्यांवर कारवाई करण्याची हिंमत दाखवली नाही. काँग्रेसने फक्त व्होट बँकचे राजकारण केले आहे. यामुळेच लाखो सैनिकांना आपले प्राण गमवावे लागले आहेत, अशी टीका उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली.

## भारताच्या निरंतर विकासामध्ये महाराष्ट्राची सर्वात महत्त्वाची भूमिका - मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

महाराष्ट्राकडे भारतातील सर्वात पुरोगामी आणि प्रगतिशील राज्य म्हणून पाहिले जाते. छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दाखविलेल्या मार्गावर चालणारा महाराष्ट्र निरंतर भारताच्या विकासामध्ये सर्वात महत्त्वाची भूमिका पार पाडतो आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत प्राणाची आहुती देणाऱ्या हुतात्म्यांना महाराष्ट्र दिनानिमित्त मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी हुतात्मा चौक येथील स्मारकास पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केले. यावेळी विधानसभेचे अध्यक्ष ॲड राहुल नार्वेकर, मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांच्यासह राज्याच्या विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी आदी मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री म्हणाले की, महाराष्ट्राला सातत्याने पुढे नेण्याचा निर्धार आहे. राज्याला ट्रिलियन डॉलर ईकॉनॉमी करण्याचा संकल्प आहे. शेवटच्या माणसापर्यंत विकास पोहचवून सर्वांना सोबत घेऊन विकसित महाराष्ट्र घडवायचा आहे, असा निर्धार आणि निश्चय महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने करत असल्याची भावना मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी व्यक्त केली.

**मुख्यमंत्री यांच्या वर्षा शासकीय निवासस्थानी ध्वजवंदन**

महाराष्ट्र राज्याच्या स्थापना दिनानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वर्षा शासकीय निवासस्थानी ध्वजवंदन करून राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली. मुख्यमंत्र्यांनी सर्वांना महाराष्ट्र राज्य स्थापना दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी राष्ट्रगीत व राज्यगीत सादर करण्यात आले. याप्रसंगी वर्षा शासकीय निवासस्थानी कार्यरत अधिकारी, कर्मचारी व पोलीस दलातील अधिकारी, जवान उपस्थित होते.

## सृजनशीलतेत चैतन्य निर्माण करण्याची क्षमता - पंतप्रधान नरेंद्र मोदी

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

व्यक्तीला चैतन्यमय व प्रसन्नतेने जगण्याचा अनुभव देण्याची ताकद ही सृजनशीलतेत आहे. त्याचप्रमाणे वाईट गोष्टींना निष्प्रभ करण्याची क्षमता असलेली सृजनशीलता प्रत्येकाने आपल्या परीने जोपासावी, असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले.

वांद्रे कुर्ला संकुलातील जिओ वर्ल्ड सेंटरमध्ये वेव्हज-२०२५ (जागतिक दृकश्राव्य मनोरंजन समिट) चा आरंभ झाला. यावेळी ‘क्रिएट इन इंडिया चॅलेंज’ मधील विजेत्यांशी पंतप्रधान मोदी यांनी संवाद साधला. यावेळी राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी म्हणाले की, भारताला संगीत, नाटकासह विविध कला प्रकारांचा समृद्ध वारसा लाभला आहे. तो अधिक वृद्धिंगत करण्यासाठी नव्या पिढीतील सृजनशीलतेला नाविन्यपूर्ण संकल्पनांसाठी विविध संधी उपलब्ध करून देत प्रोत्साहन देण्याची गरज आहे. ज्याप्रमाणे आपले शरीर कोणत्याही अपायकारक बाह्य गोष्टीला स्वीकारत नाही, त्याचप्रमाणे माणसाची सृजनशीलता वाईट गोष्टींना आपल्या मनामध्ये टिकू देत नाही. आपले मन उल्हसित

## बारावीचा निकाल १३ किंवा १४ मे रोजी, तर दहावीचा निकाल १६ मे पूर्वी जाहीर होणार

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

गेल्या काही दिवसांपासून दहावी आणि बारावीच्या निकालासंदर्भात अनेक बातम्या समोर येत आहेत. आज दहावीच्या आयसीएसई बोर्डाचा निकाल जाहीर झाला. यानंतर महाराष्ट्र राज्य बोर्डाचा निकाल कधी लागणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. अशातच आता दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाची बातमी समोर आली आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी बारावी आणि दहावीच्या निकालाची तारीख जाहीर केली आहे.

राज्यातील दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी एक महत्वाची बातमी समोर येत आहे. बारावी आणि दहावीच्या निकालाची तारीख ठरली असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली. बारावीच्या विद्यार्थ्यांची बोर्डाची परिक्षा ११ फेब्रुवारी ते ११ मार्च तर, दहावीच्या विद्यार्थ्यांची परिक्षा २१ फेब्रुवारी ते १७ मार्च या कालावधीत पार पडली. सर्व शिक्षकांनी बोर्डाने दिलेल्या वेळेत उत्तपत्रिकांची तपासणी केली. आता निकाल छपाई सुरू होईल, असेही वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले. यापूर्वी १५ मे २०२५ या तारखेपर्यंत दहावी, बारावीचा निकाल लागणार असल्याच्या चर्चा सुरु होत्या. त्यानंतर आता ११ मे पर्यंत बोर्डाचा निकाल पूर्ण होईल, असे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले आहे. त्यानुसार बारावीचा निकाल १३ किंवा १४ मे रोजी, तर दहावीचा निकाल १६ मे पूर्वी जाहीर होणार असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

**उत्तर पत्रिकांची तपासणी पूर्ण**– इयत्ता दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांच्या सर्व उत्तरपत्रिकांची तपासणी पूर्ण झालीय. ८ दिवसांत गुणांची अंतिम पडताळणी पूर्ण पान ४ वर

## अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर बालविवाह रोखण्यात यश!

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

अक्षय्य तृतीया या पवित्र आणि शुभ मानल्या जाणाऱ्या सणाच्या मुहूर्तावर विवाह सोहळ्यांचे मोठ्या प्रमाणावर आयोजन केले जाते. परंतु, याच मुहूर्तावर अनेक ठिकाणी बालविवाह होण्याचे प्रकारही समोर येतात. या पार्श्वभूमीवर महिला व बाल विकास राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी सर्व संबंधित यंत्रणांना सतर्क राहण्याचे निर्देश दिले होते. या निर्देशांची प्रभावी अंमलबजावणी केल्यामुळे राज्यात एकूण २६ बालविवाह रोखण्यात प्रशासनाला यश आले आहे.

**महिला बाल विकास विभागाची बैठक; दूरदृश्य प्रणालीद्वारे अधिकारी सहभागी**

### राज्यात २६ बालविवाह टळले

बालविवाह रोखण्यासाठी आवश्यक उपाययोजना आणि समन्वयाबाबत ‘निर्मल भवन‘ येथे महत्त्वपूर्ण बैठक घेण्यात आली. या बैठकीत दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून महिला व बाल विकास विभागाच्या आयुक्त नयना गुंडे, राज्यातील सर्व जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक तसेच विविध जिल्ह्यांतील महिला व बाल विकास विभागाचे अधिकारी सहभागी झाले. बैठकीत बालविवाहाच्या घटना रोखण्यासाठी स्थानिक प्रशासन, पोलिस यंत्रणा, अंगणवाडी कार्यकर्त्या आणि सामाजिक कार्यकर्त्यांमध्ये प्रभावी समन्वय ठेवण्यावर भर देण्यात आला.

**बालविवाह रोखण्यासाठी ठोस कार्यवाही** – अक्षय्य तृतीयेच्या पूर्वसंध्येला नांदेड जिल्ह्यातील भोकर शहर आणि मुखेड तालुक्यातील मंगनाळी या गावात होणारे दोन बालविवाह वेळेत हस्तक्षेप करून रोखण्यात आले. या कारवाईमुळे स्थानिक पातळीवर जनजागृती झाली असून, बालविवाह रोखण्यासाठी प्रशासन सज्ज असल्याचा संदेश गेला आहे.

**बालविवाहमुक्त महाराष्ट्राची संकल्प** – राज्यातील विविध भागांतून आलेल्या अहवालांनुसार, फक्त एका दिवसात २६ बालविवाह रोखण्यात आले. यामुळे महिला व बाल विकास विभागाच्या प्रयत्नांचे फलित स्पष्ट झाले आहे. याबाबत बोलताना राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर म्हणाल्या, बालविवाहमुक्त महाराष्ट्र घडवण्याचा संकल्प आम्ही केला आहे. यासाठी सर्व संबंधित यंत्रणा एकत्र येऊन काम करणार आहेत.

**सर्व स्तरांवर एकत्रित प्रयत्नांची गरज**– बालविवाह ही सामाजिक आणि कायदेशीरदृष्ट्या गंभीर समस्या असून, तिचे निर्मूलन करण्यासाठी सर्व स्तरांवर एकत्रित प्रयत्नांची गरज आहे. अक्षय्य तृतीयेच्या निमित्ताने घेतलेली ही ठोस पावले बालकांच्या सुरक्षित भविष्याकडे उचललेले सकारात्मक पाऊल ठरू शकतात असे यावेळी श्रीमती बोर्डीकर म्हणाल्या.

## समृद्ध महाराष्ट्र:'जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा

मुंबई कुणाची? महाराष्ट्र आणि गुजरात या दोन प्रातांच्या वादात भाषावार प्रांत रचनेनुसार १ मे १९६० रोजी मुंबईसह महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. स्वतंत्र भारतात मराठी भाषिकांचे 'महाराष्ट्र' हे राज्य स्थापन झाले. हजारो नागरिकांचे योगदान असलेल्या संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत १०६ आंदोलक हुतात्मा पावले. मुंबईतील फ्लोरा फाऊंटन येथील त्यांच्या स्मारकास वंदन करून, मोठ्या उत्साहात, अभिमानाने १ मे ला 'महाराष्ट्र दिन' आपण सारे साजरा करतो. या दिवशी शासकीय आणि इतरत्रही इमारतीवरही ध्वजारोहण होते. शिवाजी पार्क येथे परेडसहित होणाऱ्या कार्यक्रमांत महाराष्ट्राचा सांस्कृतिक वारसा सादर करतात.

पूर्वी मोठ्या प्रमाणावर कामगारांचे शोषण होत असे. १५ तास काम आणि पैसे (?). लेबर किसान पार्टी ऑफ इंडियाच्या वतीने १ मे १९२३ या दिवशी भारतात प्रथमच हाती लाल झेंडे घेऊन कामगार एकत्र जमले. मुख्य मागणी आठ तास काम आणि पगार. यापूर्वी शिकागो, ऑस्ट्रेलिया येथेही अशा घटना घडल्या होत्या. मागण्या मान्य झाल्यावर कामगारांच्या प्रयत्नांचे आणि कार्याचे प्रतीक म्हणून १ मे हा कामगार दिवस जगभरात साजरा केला जातो. १९८९ मध्ये या दिवसाला 'आंतरराष्ट्रीय कामगार दिन' म्हणून मान्यता मिळाली. महाराष्ट्र हे जमिनीच्या क्षेत्रफळाच्या दृष्टीने भारतातील तिसरे आणि लोकसंख्येच्या बाबतीत दुसरे सर्वात मोठे राज्य. वळण १- महाराष्ट्राला मोठा इतिहास असलेल्या मराठी संतांनी भागवत धर्माची पताका फडकवत ठेवत वारकरी संप्रदायाचा पाया घातला. (पंढरपूरची आषाढी एकादशी) हाच भक्ती चळवळीचा प्रमुख प्रवाह. यांनीच महाराष्ट्राच्या मराठी संस्कृतीचा पाया घातला. वळण २-ग्रामीण भागात समूहाने सादर केले जाणारे पारंपरिक कलाविष्कार; महाराष्ट्राची लोककला. दशावतार, भजन, कीर्तन, पोवाडा आणि लावणी (महाराष्ट्राचे विशेष नृत्य). गाडगेबाबांनी लोककलेतूनच स्वच्छतेचे, शिक्षणाचे महत्त्व लोकांमध्ये बिंबवले. वळण ३-स्त्री शिक्षणाचे प्रणेते महात्मा जोतिबा आणि सावित्रीबाई फ ुले, मर्यादित कुटुंबाचे फायदे सांगणारे महर्षी धोंडो केशव कर्वे. अशा अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी जुन्या रूढी-कर्मकांडांना छेद देऊन लोकांना बुद्धिसाक्षर केले. वळण ४-साहित्यिक-विचारवंत-विज्ञानवादी यांनी अध्यात्माला विज्ञानाची जोड देत समाजाची मानवतावादी बैठक तयार करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर विज्ञानाची झालेली भौतिक प्रगती. मूलतः महाराष्ट्र राज्य त्याच्या संस्कृती आणि सौंदर्यासाठी प्रसिद्ध. भारताच्या पश्चिमेकडे असलेला महाराष्ट्राला ७२० किलोमीटर लांबीचा लाभलेला समुद्रकिनारा, घनदाट हिरवाईने झाकलेला सह्याद्रीच्या पर्वतरांगा आणि दख्खनच्या पठारावरून वाहणाऱ्या नद्या. हे महाराष्ट्राचे नैसर्गिक सौंदर्य.

हिंदवी मराठा साम्राज्यची स्थापना करणारे छत्रपती शिवाजी महाराजांमुळे आधुनिक महाराष्ट्राचा उदय झाला. महाराष्ट्राचे दैवत छत्रपती शिवाजी महाराज, त्यांनीच महाराष्ट्रात पहिल्या नौदल पथकाची स्थापना केली. शिवाजी महाराजांनी बांधलेले गड-किल्ले हे महाराष्ट्राचे ऐतिहासिक वैभव. त्यांचे संवर्धन करणे ही आजची गरज. भारताच्या स्वातंत्र लढ्यात महाराष्ट्राचे (टिळक आगरकर सावरकर) योगदानही उल्लेखनीय आहे. कोकण, पश्चिम व उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भ हे महाराष्ट्राचे पाच विभाग. प्रादेशिक प्रातांनुसार मराठी भाषेचे वळण प्रत्येक विभागात बदलते. तसेच सण-उत्सवाचे स्वरूप विभागवार प्रादेशिक वैशिष्ट्यानुसार स्वतःचे असते. एकत्र आणणाऱ्या सण-समारंभात महाराष्ट्रात, मुख्यतः मुंबईत इतर धर्मीयही सहभागी होतात.

'विविधतेत एकता' या भारतीय संस्कृतीनुसार यात महाराष्ट्र समृद्ध आहे. प्रत्येक प्रार्थना स्थळाचे स्थापत्य वेगळे असते. कोल्हापूर, पंढरपूर, तुळजापूर, शेगांव, शिर्डी या धार्मिक स्थळासोबतच औरंगाबाद, कोकण, आंबोली, महाबळेश्वर ही पर्यटन स्थळे. महाराष्ट्राला लाभलेला समुद्र, डोंगर, दऱ्या, महाराष्ट्रातील अभयारण्ये, राष्ट्रीय उद्यान, गडचिरोली येथील जंगल, प्राणी संग्रहालय ही नैसर्गिक पर्यटन, याशिवाय हस्तकला, चित्रकला, शिल्पकला, फोटोग्राफी यांच्या प्रदर्शनातूनही महाराष्ट्र दर्शन होते. आपल्याकडील जागतिक वारसा स्थळ अजंठा, वेरूळ, एलिफन्टा लेण्यांतील सौंदर्य आणि जैव विविधतेसाठी प्रसिद्ध असलेला पश्चिम घाट पाहण्यासाठी खास अभ्यासक परदेशातून येतात. कोळीनृत्य, दुर्गापूजा, गणेशउत्सव, दहीहंडी, दिवाळी हे महाराष्ट्राचे प्रमुख आकर्षण. झुणका-भाकर, पूरण पोळी, महाराष्ट्राच्या थाळीला समतोल आहाराची मान्यता आहे. आस्वाद घ्या. ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त खांडेकर, शिरवाडकर, करंदीकर; कवी केशवसुत, कुसुमाग्रज (मराठी भाषादिन), चित्रपटाचे जनक दादासाहेब फाळके, व्ही.शांताराम, सुनील गावस्कर, सचिन तेंडुलकर, लता मंगेशकर, भीमसेन जोशी, जयंत नारळीकर, विजया मेहता प्रत्येक क्षेत्रात महाराष्ट्राची ओळख जगात पोहोचली आहे. मराठी साहित्य जगाला माहीत आहे. कुसुमाग्रजांचे काव्य गुलजार यांनी हिंदीत केले. अनुवादित साहित्यामुळे परप्रांतीय लेखनाचा आपण आस्वाद घेतो. आज संगीत, नृत्य, अभिनय, नाटक, चित्रपट यांच्या शाखा उपशाखेत कलाकार-तंत्रज्ञान यांची होत असलेली सांस्कृतिक देवघेव, शिकणे-शिकवणे, मार्गदर्शन करणे, प्रोत्साहन देणे ही महाराष्ट्राची समृद्धी आहे.

मुंबई महाराष्ट्राची नव्हे भारताची आर्थिक राजधानी. याचे प्रमुख कारण सर्व प्रमुख बँका, वित्तियसंस्था, विमा कंपन्या, मुच्युअल फंड बरोबरच टाटा, गोदरेज, रिलायन्स, शेअर बाजार, स्टॉक एक्स्चेंज शिवाय अनेक आंतरदेशीय कंपन्यांची मुख्यालये मुंबईतच आहेत. नरिमन पॉईट-बीकेसी ही आजची आर्थिक केंद्र आहेत. आज मुंबईने माहिती क्षेत्र, संगणक, मोबाईल यात स्वतःचे स्थान निर्माण केले आहे. वातानुकूलित बस रेल्वे सेवेची सुरुवात झाली. रस्ते, रस्त्यांना जोडणारे पूल, जलमार्ग, भुयारी मार्ग, मेट्रो, मुंबई पुणे-मुंबई नागपूर समृद्धी मार्ग सारी कामे वेगाने चालू आहेत. साऱ्या मनोरंजनाची केंद्रबिंदू मुंबईच आहे. बॉलिवूड, देशी-विदेशी खेळाची मैदाने, स्टेडियम, चित्रपट गृह, नाटक, मॉल, नेहरू तारांगणः इ. कापड गिरण्याऐवजी दागिने, हिऱ्याचा व्यापार, आरोग्यसेवा, अन्य उद्योगव्यवसाय, मुंबई हे बंदर असल्याने शिपिंग उद्योग सारे सुस्थितीत आहे. मुंबईची ट्रेन, मुंबईचा वडापाव, मुंबईचे फेरीवाले, उबर टॅक्सी चालवणारे असे रोजगारावर उपजीविका करणारे अनेक. युवकांसाठी स्टार्टअप प्रमाणही मुंबईत जास्त, साऱ्याची घरपोच सेवा उपलब्ध. मुख्यतः महाराष्ट्राच्या कारभाराची वास्तू 'मंत्रालय' मुंबईतच. महाराष्ट्र राज्याचे दरडोई उत्पनात लक्षणीय वाढ होतेय. महाराष्ट्र वीज निर्मितीसाठी सोलर प्लांट सगळीकडे नेण्याचा विचार चालू आहे. वित्तीय विभाग, सॉफ्टवेअर, संगणक कैशल्य, पुण्यात हिंजवडी येथे आयटी पार्क आहे. पुण्यातील बजाज, टाटा मोटर्स अशा अनेक कंपन्यानमुळे पुण्याचा भारताची मोटार सिटी म्हणून उल्लेख करतात.

विदर्भ कृषी प्रधान (लाकूड) तरी विदर्भ, मराठवाडा येथे प्राथमिक बरेच प्रश्न आहेत. नागपूर येथील कार्गो हब आणि विमानतळ हा प्रकल्प. रस्ते निर्मितीत महाराष्ट्र पुढे. महाराष्ट्र नवीन उद्योगांना प्रोत्साहन देतो यासाठी देशातील प्रमुख कंपन्या महाराष्ट्राला प्रथम पसंती देतात.

२०२५च्या अर्थ संकल्पात युवकांसाठी, शेती साठी विशेष योजना आहेत. सारा व्यवहार ऑनलाईन झाल्यामुळे कामांत पारदर्शकता आली. मोबाईल बँकिंगमुळे ग्रामीण भागातील लोकांना सोयीचे झाले. हे सारे उल्लेखनीय असतानाही मुंबईत-महाराष्ट्रात स्वच्छता,प्लास्टिक पिशव्याचा रोजचा वापर येथे (नागरिक मनावर घेत नसल्यामुळे) सरकार कमी पडते. कुठेतरी शिस्त किंवा बंदी किंवा काहीतरी कारवाई हवी. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात लोकांना पोचवणारी लाल डब्याची एसटी, एसटी आगारची दुरवस्था. बस इंजिनची क्षमता त्यांची विश्रांती स्थाने पूर्णतः कायापालट व्हायला हवा.

ग्रामीण जनतेचा प्रवास कधी सुखासीन होणार? काही वर्षांपूर्वी नितू मांडके यांचे बोलणे आठवते. आज रोज नव्याने गाड्या बाहेर पडतात. हृदरोपणात लागणाऱ्या काही भाग परदेशातून आणाव्या लागत असल्याने पेशंटला महाग पडतात. त्याचे उत्पादन महाराष्ट्रात येथे झाले तर...,रस्ते विकासात फोडलेला डोंगर परत कसा उभारला जाणार? झाडे लावता येतात. 'महाराष्ट्राची प्रगती हेच महाराष्ट्राचे एकमेव धैय' हे लक्ष्य असताना जात धर्म प्रांत आणि पक्ष यांच्यामुळे अडथळे येतात. तसेच जन्माने नाही पण कर्माने येथे मोठे होऊन राहूनही लोक महाराष्ट्राला, मुंबईला आपलेसे मनात नाहीत हीच शोकांतिका आहे. १ मे मराठी राज भाषा दिन! मराठी भाषेमुळे मुंबई महाराष्ट्राची झाली. मराठी भाषा-संस्कृतीचे रक्षण, संवर्धन ही महाराष्ट्रात राहणाऱ्या प्रत्येकाची जबादारी आहे.

# जगाच्या पाठीवर कामगारांचा नवा इतिहास

**भारतात लेबर किसान पार्टीने १ मे १९२३ साली पहिल्यांदा कामगार दिन साजरा केला होता. त्यावेळी भारतात कामगारांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी लाल रंगाचा झेंडा वापरण्यात आला होता. भारतात हा दिवस आंतरराष्ट्रीय कामगार दिन आणि महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली म्हणून महाराष्ट्र दिन म्हणूनही साजरा केला जातो. सदर ज्ञानवर्धक संकलित माहिती श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी देताहेत... संपादक.**

**सतराव्या** शतकाच्या मध्यात सुरु झालेल्या औद्योदिक क्रांतीने युरोपमध्ये एका नव्या युगाची सुरुवात केली होती. मात्र या नवीन युगाबरोबरच नव्या समस्याही उदयास आल्या. त्यातील एक समस्या होती कामगरांची. युरोपात औद्योगिक क्रांतीला सुरुवात तर झाली मात्र कामगार वर्गाचे शोषण वाढीस लागले. त्यावेळी कामाचे तास हे आठ दहा नव्हते. तर कामगारांना तब्बल १५ तास काम करावे लागे. त्यातल्या त्यात जनावरासारखं काम करून मोबदलाही मिळत नव्हता. मात्र मजुरांनी याविरोधात आंदोलन पुकारलं. कामगारांच्या या पाऊलाने जगाच्या पाठीवर कामगारांचा नवा इतिहास कोरला गेला. मात्र आजही उद्योगहीन गडचिरोलीसारख्या जिल्ह्यात नव्याने सुरू झालेल्या कंपन्या, उद्योगमालक कामगारांना मनमर्जीने खूप राबवून- शोषण करून घेत रग्गड मुनाफा कमवत आहेत. दररोज १० ते १२ तास कष्टवून घेत आहेत. रविवार जागतिक-सार्वजनिक सुट्टीचा वार असूनही सुट्टी मिळत नाही. कोणीही याबद्दल आवाजही उठवत नाही. कारण कामावरून काढून टाकण्याची धमकी पेरली जात आहे. याचेच मोठे नवल वाटते! विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि शिक्षणसम्राट महात्मा जोतीबा फुले यांच्या प्रयत्नांना व विचारांना बेमूर्वत पायदळी कुस्करले जात आहे.

आजच्या दिवशी अमेरिकेत कामगारांनी ७ तासांचे काम असावे अशी मागणी केली होती. ऑस्ट्रेलियात ही चळवळ पुढे आठ तासांचा दिवस म्हणून ओळखली जाऊ लागली. २१ एप्रिल हा दिवस तेव्हापासून ऑस्ट्रेलियात कामगार दिन म्हणून साजरा केला जातो. मात्र १ मे रोजी ऑस्ट्रेलियात थरारक घटना घडली. युनायटेड स्ट्रेट्समधील कामगारांनी आठ तास काम करण्याचे आवाहन पुकारले. मागण्यांसाठी संप आणि मोर्चे निघाले. मात्र त्यावेळी झालेल्या आंदोलकांना पोलिसांनी ट्रकने हुसकावून लावले. या घटनेने कामगारांतील संताप आणखी वाढला. प्रत्युत्तर म्हणून पोलिसांवर बॉम्बस्फोट करण्यात आले. यात ७ पोलिस आणि ४ नागरिकांचा मृत्यू झाला. याप्रकरणी आठ जणांना अटक होऊन फाशीची शिक्षा सुणावण्यात आली. या घटनेने जगभर संताप व्यक्त झाला. कारण या ८ जणांपैकी कोणीही बॉम्ब फेकले नसल्याचे सांगण्यात येत होते. अशा प्रकारे या रक्तरंजित आंदोलनानंतर १ मे १९८० रोजी कामगार चळवळ यशस्वी झाली. न्याय्य वेतन, चांगली वागणूक, पगारी रजा आणि ८ तास काम या मागण्या मान्य करण्यात आल्या. तेव्हापासून हा दिवस अमेरिकेत कामगार दिन म्हणून साजरा केला जातो. सन १९०४मध्ये एमस्टरडॅम येथे झालेल्या दुसऱ्या आंतरराष्ट्रीय संघ परिषदेने जगभरातील कामगार संघटनांना १ मे हा दिवस ८ तासांचा दिवस म्हणून पाळण्याचे आवाहन केले. भारतीय मजदूर किसान पक्षाने दि.१ मे १९२३ रोजी सर्वप्रथम कामगार दिन साजरा केला. त्याच वेळी भारतात प्रथमच कामगार दिनाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी लाल ध्वज वापरण्यात आला.

१ मे या दिवसाला महाराष्ट्रात खूप महत्त्व आहे, कारण या दिवशी महराष्ट्र राज्याची स्थापना झाली. मात्र एवढंच नाही १ मेला आंतरराष्ट्रीय महत्त्वदेखील आहे. कारण जगभरात हा दिवस आंतरराष्ट्रीय कामगार दिन म्हणून साजरा केला जातो. अठराव्या शतकात झालेल्या एका कामगार चळवळीच्या गौरवासाठी आजही जगभरात साजरा करण्यात येणारा हा एक खास दिवस आहे. भारतात कामगार दिनानिमित्त सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात येते. विशेष म्हणजे जगभरात अनेक देशांमध्ये हा दिन निरनिराळ्या पद्धतीने साजरा केला जातो. कामगार दिन साजरा करण्याची सुरुवात कामगारांच्या हितानिमित्त झालेल्या एका चळवळीतून झाली.



- संकलन व शब्दांकन -
**श्री एन. के. कुमार**
जी. से.नि.अध्यापक.
गडचिरोली मोबा-
७७७५०४१०८६.

१९व्या शतकाच्या मध्यावर कामगारांच्या एका तीव्र चळवळीला सुरूवात झाली. ज्यात कामगारांच्या हितासाठी काही मागण्या करण्यात आल्या होत्या. पहिली मागणी २१ एप्रिल १८५६ रोजी ऑस्ट्रेलियातील कामगारांनी केली होती. दिवसाचे कामाचे तास ठराविक असावेत यासंदर्भात ही मागणी होती. ऑस्ट्रेलिया पाठोपाठ पुढे मग अमेरिका, कॅनडामधील कामगार संघटनांनी पुढाकार घेत १९८६मध्ये कामगारांच्या हितासाठी मोर्चे काढण्यास सुरुवात केली. अशाच एका मोर्च्यामध्ये शिकागो मधील सहा आंदोलकांचा मृत्यू झाला. ज्याबद्दल कामगारांनी तीव्र निषेध व्यक्त केला. पोलिसांवर राग व्यक्त करण्यासाठी एका अज्ञात व्यक्तीने बाँम्ब टाकला आणि त्यात आठ पोलिसांचा मृत्यू आणि पन्नास पोलीस जखमी झाले होते. याची शिक्षा म्हणून आठ आंदोलन कर्त्यांना फाशी देण्यात आली होती. मात्र त्यामुळे जगभरात संतापाची लाट पसरली, कारण त्या आठ जणांपैकी एकानेही बाँम्ब फेकलेला नव्हता. या रक्तरंजित इतिहासानंतर या आंदोलनाला एक भव्य दिव्य स्वरूप प्राप्त झाले. सन १९९०ला कामगारांची ही चळवळ यशस्वी झाली. शिकागोमधील या घटनेचे स्मरण करण्यासाठी रेमंड लेविन यांनी आंतरराष्ट्रीय आंदोलनाचे आयोजन करण्याची मागणी केली. त्यांनी ही मागणी १९८९ साली आयोजित दुसऱ्या आंतरराष्ट्रीय पॅरीस परिषदेत केली होती. त्या परिषदेमध्ये १ मे १८९० हा दिवस जागतिक एकता दिवस म्हणून साजरा करण्याचे निश्चित करण्यात आले. पुढे १८९१च्या दुसऱ्या परिषदेत या कार्यक्रमाला औपचारिक मान्यता देण्यात आली. ज्यामुळे आज जगभरात १ मे हा दिवस आंतरराष्ट्रीय कामगार दिन म्हणून साजरा केला जातो. हा दिवस कामगारांच्या हितानिमित्त केल्या गेलेल्या त्या चळवळीचे प्रतिक आहे. ज्यामध्ये कामगारांनी दिवसाचे कामाचे तास आठ असावेत, अशी प्रमुख मागणी केली होती. कारण त्यापूर्वी कामगारांना दिवसभरात पंधरापेक्षा जास्त तास काम करावे लागत असे. पुढे लोक या चळवळीला आठ तासांची चळवळ म्हणूनही ओळखू लागले. या चळवळीत कामगारांच्या कामाच्या तासांसोबतच त्यांना कामाच्या बदल्यात मिळण्याऱ्या वागणूक आणि मोबदल्या विषयीही प्रमुख मागण्या करण्यात आलेल्या होत्या. शिकागो आंदोलनानंतर कामगारांना आठ तासांचे काम, योग्य मोबदला, चांगली वागणूक, पगारी सुट्टी मिळू लागली. निरनिराळ्या समाजवादी, साम्यवादी आणि अराजकवादी गटांनी केलेल्या निर्दशनासाठी १ मे हा दिवस ओळखला जातो. युरोपमध्ये पूर्वीपासून १ मे हा दिवस वसंतउत्सव म्हणूनही साजरा केला जात असे. पुढे या आंदोलनामुळे युरोपमध्ये ही हा दिवस कामगार दिन म्हणून साजरा होऊ लागला. सन १९०४ साली एमस्टरडॅम येथे झालेल्या दुसऱ्या जागतिक परिषदेत संपूर्ण जगभरातील कामगार संघटनांना १ मे हा दिवस कामगार दिन म्हणून साजरा करावा असं आवाहन करण्यात आलं होतं. आजही अनेक प्रमुख देशांमध्ये १ मे निमित्त सार्वजनिक सुट्टी जाहीर केली जाते. त्याचप्रमाणे या दिवसानिमित्त अनेक देशांमध्ये खास कार्यक्रम आणि सैन्याचे संचलन आयोजित केले जाते. भारतात लेबर किसान पार्टीने १ मे १९२३ साली पहिल्यांदा कामगार दिन साजरा केला होता. त्यावेळी भारतात कामगारांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी लाल रंगाचा झेंडा वापरण्यात आला होता. भारतात १ मे हा दिवस आंतरराष्ट्रीय कामगार दिन आणि महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली म्हणून महाराष्ट्र दिन म्हणूनही साजरा केला जातो.

ज्या लोकांकडे पुरेसे शिक्षण नाही किंवा ज्यांची आर्थिक परिस्थिती चांगली नाही, अशा लोकांना आयुष्यात भरपूर कष्टाची कामे करावी लागतात. जगण्यासाठी पुरेसा पैसा कमवणे याची चिंता करण्यात त्यांचे आयुष्य जाते. कामगार चळवळीनंतर कामगाराच्या हितासाठी प्रत्येक देशात काही कायदे करण्यात आले आहे. भारतीय कामगार कायदा म्हणजे भारतातील कामगारांचे नियम करणारा कायदा. भारतात कामगारांना योग्य संरक्षण मिळावे यासाठी काही कायदे करण्यात आलेले आहेत. यात २०० राष्ट्रीय आणि ५० केंद्रिय कायद्यांचा समावेश आहे. भारतातील कामगार कायद्यांची व्याख्या एकसंध नाही. कारण सरकार स्थापना आणि भारतीय घटनेच्या समवर्ती यादीत कामगार हा एक विषय असल्यामुळे ते प्रत्येक राज्यात भिन्न आहेत. मात्र भारतात यासंदर्भात एक महत्त्वाचा कायदा नक्कीच करण्यात आला आहे. जो आहे ङ्गदी चाईल्ड लेबर एक्ट ऑफ १९८६ङ्घ थोडक्यात बालकामगार कायदा. लहान मुलांच्या हितासाठी करण्यात आलेला हा कायदा आहे. बऱ्याचदा लहान वयातच कष्टाची कामे करावी लागल्यामुळे अनेक लहान मुलांना शिक्षणापासून वंचित राहावे लागते. या कायद्यानुसार भारतात चौदा वर्षांखालील बालकांना मजूरी अथवा काम करण्यास मनाई आहे. कामगारांच्या कामाची गुणवत्ता वाढवणे तसेच लहान मुलांचा मजूरीसाठी गैरवापर आणि छळवणूक टाळणे यासाठी हा कायदा करण्यात आलेला आहे. १ मे या दिवसाला महाराष्ट्रात खूप महत्त्व आहे, कारण या दिवशी महराष्ट्र राज्याची स्थापना झाली. मात्र एवढंच नाही १ मेला आंतरराष्ट्रीय महत्त्वदेखील आहे. कारण जगभरात हा दिवस आंतरराष्ट्रीय कामगार दिन म्हणून साजरा केला जातो. अठराव्या शतकात झालेल्या एका कामगार चळवळीच्या गौरवासाठी आजही जगभरात साजरा करण्यात येणारा हा एक खास दिवस आहे. भारतात कामगार दिनानिमित्त सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात येते. विशेष म्हणजे जगभरात अनेक देशांमध्ये हा दिन निरनिराळ्या पद्धतीने साजरा केला जातो. म्हणून कंपनीमालक आणि उद्योजकांनी मनमानी न करता कामगारांना त्यांच्या हक्काची सार्वजनिक- सरकारी रविवारची सुट्टी देणे

# मुंबईत साकारणार 'आयआयसीटी'- माहिती व प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव



**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

भारतात पहिल्यांदाच इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजी (खखउढ) मुंबईत स्थापन होणार असून, त्यासाठी केंद्र सरकारने ४०० कोटी रुपये मंजूर केले असल्याचे रेल्वे आणि माहिती व प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले.

वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल अँड एन्टरटेन्मेंट समिट २०२५ (व्हेव्ज) चे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन झाले. यावेळी श्री. वैष्णव बोलत होते. मुंबईतील जिओ वर्ल्ड कन्व्हेंशन सेंटर मध्ये झालेल्या या कार्यक्रमात राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर, माहिती व प्रसारण राज्यमंत्री डॉ. एल. मुरुगन, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

माहिती व प्रसारण मंत्री वैष्णव म्हणाले, 'आयआयसीटी'च्या स्थापनेसाठी गुगल, अॅपल, मायक्रोसॉफ्ट आणि अॅडोबी सारख्या आंतरराष्ट्रीय कंपन्यांचे सहकार्य लाभणार आहे. वेव्हज या व्यासपीठाच्या माध्यमातून भारत सर्जनशील उद्योगजगताच्या जागतिक केंद्रस्थानाच्या दिशेने वाटचाल करीत आहे.

सर्जनशीलतेच्या जगात सध्या मोठे परिवर्तन घडत आहे. तंत्रज्ञानामुळे सर्जनशील उद्योग आता सर्वांसाठी खुले झाले आहेत. कंटेंट तयार करण्याच्या पद्धतीत बदल झाला आहे, तसेच कंटेंटचा उपभोग घेण्याचे माध्यमही बदलत आहे.

या बदलत्या प्रक्रियेची समज आणि वाटचाल एकत्रितपणे करण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी संपूर्ण सर्जनशील जगाला वेव्हजच्या व्यासपीठावर एकत्र आणण्याचा निर्णय घेतला आहे.

ङ्गजागतिक ऑडिओ-व्हिज्युअल एंटरटेनमेंट समिट हे व्यासपीठ जगभरातील निर्मात्यांसाठी खुले आहे. हे व्यासपीठ नवीन तंत्रज्ञानाचे प्रदर्शन, गुंतवणूकदार, निर्माते आणि खरेदीदार यांच्याशी जोडणारी संधी देईल. यामुळे नव्या आर्थिक संधींचा उगम होईल.

या परिषदेस जगभरातून धोरणकर्ते, उद्योग नेते आणि ७५ देशांतील निर्माते सहभागी झाले असून पुढील चार दिवसांत १०० सत्रे विविध स्वरूपात पार पडणार आहेत. सर्जनशील समुदाय क्रिएट इन इंडिया स्पर्धांमध्ये मोठ्या प्रमाणावर सहभागी झाले असून ३२ क्षेत्रांमध्ये ह्या स्पर्धा झाल्या असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

# जनगणनेत ओबीसी टक्केवारी वाढली तर घटनात्मक पेच निर्माण होणार!

## आरक्षणाचे जेष्ठ अभ्यासक डॉ. राजेंद्र दाते पाटील

**इंद्रा सहानी प्रकरणातील ५० टक्के मर्यादा कशी संपणार ?**

प्रतिनीधी (मुंबई) महाराष्ट्रा मध्ये, बांठिया आयोग ही एक विशेष समिती होती जी ओबीसी आरक्षणा संदर्भात अहवाल देण्यासाठी स्थापन करण्यात आली होती.या आयोगाचे अध्यक्ष जयंत कुमार बांठिया होते, जेपूर्वीचे मुख्य सचिव होते.आता आयोगाच्या शिफारशी आणि समितीच्या शिफारशी यास घटनात्मक स्वरूप आहे.जात निहाय जनगणनेत जर ओबीसी टक्केवारी वाढली तर घटनात्मक पेच निर्माण होणार असल्याचे स्पष्ट मत पीपल्स फोरम फॉर सोशल कॉजचे सचिव आणि आरक्षणाचे जेष्ठ अभ्यासक ड राजेंद्र दाते पाटील यांनी आमच्या प्रतिनीधी सोबत व्यक्त केले.

पुढे ते बोलतांना म्हणाले की, न्यायमूर्ती रोहिणी आयोगाचा अहवाल चार गटात विभाजन केले त्यात फायदा होईल किंवा नाही या पेक्षा जास्त विचार करणे महत्वाचे ठरेल की इंद्रा सहानी प्रकरणाचे ५० टक्केची मर्यादा परत आडवी येऊन समस्या निर्माण होणार असल्याची बाब आम्ही सतत पुढे केल्या मुळे जात निहाय जनगणना साठी प्रचंड मोठे मनुष्यबळ लाखो करोड रुपयांची व्यवस्था कशी आणि कुठल्या हेड मधुन करणार हा मागील अनुभव पहाता हे महत्वाचे ठरणार असुन यासाठी किती वेळ लागेल याचे सुद्धा वेळेची निश्चिती असलेला म्हणजे टाईम बॉंड प्रोग्राम जाहीर होणे आवश्यक आहे.आता यामुळे प्रगत जात बाहेर काढण्यासाठी प्रयत्न केला जाईल आणि त्यात अनेक जातींचे नुकसान होणार आहे कारण जनगणना जरी झाली तरी त्याचा वाटप करायचा ठरले तर ते कसे ठरवणार ? हा मोठा प्रश्न असुन इंद्रा सहानी प्रकरणा तील ५०% मर्यादा घटनादुरूस्ती केल्या शिवाय ओलांडता येणार नाही मग जनगणना अहवाल फक्त ' रिपोर्ट 'पुरता मर्यादेत राहील म्हणुन घटनात्मक तरतुद केल्या शिवाय ओबीसी आरक्षणाचे प्रमाण वाढवता येणार नाही. एस सी एस टी यात येणार नसल्यामुळे जेष्ठ अभ्यासक राजेंद्र दाते पाटील यांनी गेली अनेक वर्षापासून मागणी केली होती की,घटना दुरूस्ती केल्या शिवाय आरक्षण मर्यादा वाढवणे शक्य होणार नसल्यामुळे इंद्रा सहानीची ५० टक्के मर्यादा ओलांडण्यासाठी पहिल्यांदा घटनादुरूस्ती केल्या शिवाय आरक्षणाच्या प्रतीक्षेत असलेल्या कोणालाही लाभ होणार नाही असे अगदी स्पष्ट मत जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी नमुद करुन त्यांना अत्यंत किचकट आणि अभ्यासु माहिती देताना नमुद केले की,

**आयोगाचे मुख्य कार्य:**

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत ओबीसी आरक्षण लागू करण्यासाठी आवश्यक माहिती आणि डेटा गोळा करणे.



### आमची जनगणना, आमचे भविष्य

भारताच्या तत्कालीन महामहीम राष्ट्रपती प्रतिभा ताई पाटील जनगणना आयुक्त सी. चंद्रमौली यांच्या कडून २०११ च्या जन गणनेचा अहवाल स्वीकारला. सर्वाधिक लोकसंख्या असलेले राज्य उत्तर प्रदेश १९९,८१२,३४१ सर्वात कमी लोकसंख्या असलेले राज्य सिक्कीम (६१०,५७७)अनुसूचित जाती २०१,३७८,३७२ अनुसूचित जमाती १०४,५४५,७१६. २०११ च्या भारताच्या जनगणनेला समर्पित पाल तिकिट २८ राज्ये आणि ८ केंद्रशासित प्रदेशांमध्ये पसरलेल्या या जनगणनेत ६४० जिल्हे, ५,९२४ उपजिल्हे, ७,९३५ शहरे आणि ६,००,००० हून अधिक गावे समाविष्ट होती. एकूण२.७ दशलक्ष अधिकाऱ्यांनी ७,९३५ शहरे आणि ६,००,००० गावांमधील घरांना भेटी दिल्या आणि लोकसंख्येचे लिंग, धर्म, शिक्षण आणि व्यवसाया नुसार वर्गीकरण केले. या अभ्यासाचा खर्च अंदाजे २,२०० कोटी होता अशी अत्यंत महत्वाची माहिती पीपल्स फोरम फॉर सोशल कॉजचे सचिव डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी दिली.

ओबीसी आरक्षणाचे सामाजिक - आर्थिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या घटकांवर काय परिणाम होतो, याचा अभ्यास करणे.ओबीसी आरक्षणा संदर्भात कायदेशीर आणि तांत्रिक बाबींचा अभ्यास करणे. ओबीसी आरक्षण लागू करण्यासाठी राज्य सरकारला शिफारशी करणे.



**आयोगाचा अहवाल:**

आयोगाने आपला अहवाल राज्य सरकारला सादर केला, ज्यामध्ये ओबीसी आरक्षणा साठी २७ % आरक्षण देण्याची शिफारस करण्यात आली होती. हाअहवाल राज्य सरकारने स्वीकारला आणि ओबीसी आरक्षणाचे योग्य नियोजन करण्या साठी राज्य सरकारने योग्य कार्यवाही केली.

ओबीसी समुदायाच्या राजकीय आरक्षणा बाबत एक महत्त्वाची सुनावणी सुप्रीम कोर्टात झाली माजी मुख्य सचिव जयंतकुमार बांठिया आयोगाचा अहवाल स्वीकारुन न्यायालय स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकी साठी २७ टक्के ओबीसी आरक्षण मान्य करणार होते काय ? याकडे महाराष्ट्रासह संपूर्ण देशाचं लक्ष लागले होते.जयंत बांठिया यांचा अहवाल राज्य सरकारने सुप्रीम कोर्टात सादरही केला होता. ओबीसींच्या राजकीय आरक्षणा साठी सुप्रीम कोर्टानं ज्या ट्रिपल टेस्टची पूर्तता करायलासांगितले होते, त्याच आधारावर प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्था निहाय हा रिपोर्ट असल्याचा सरकारचा दावा झाला होता आहे.

**जयंत बांठीया अहवाला तील महत्त्वाचे मुद्दे :** राज्य सरकारने दिनांक ११ मार्च २०२२ रोजी स्थानिक स्वराज्य संस्थेतील इम्पिरिकल डेटा मिळवण्यासाठी जयंतकुमार बांठीया यांच्या अध्यक्षतेखाली कामकाज सुरू केले.

जयंत बांठीया यांनी आपला अहवाल व शिफारशी ७ जुलै २०२२ रोजी सरकारला सादर केला.

जयंत बांठीया यांनी आपल्या शिफारशी मध्ये ओबीसी हे नागरिकांचा मागासवर्ग या सदरात मोडत असून ते राजकीय मागास असल्याचे शिफारशीत सांगितले आहे.

मतदार यादीनुसार सर्वे रिपोर्ट म्हणजे जनगणना अहवाल प्रमाणे इतर मागासवर्गीयांची लोकसंख्या ३७ टक्के असल्याचे अनुमानित करण्यात आले.

राज्यामध्ये एकूण जनसंख्या जरी ३७ टक्के दाखविण्यात आली असली तरी स्थानिक स्वराज्य संस्थां मध्ये ही लोक संख्या वेगवेगळी दर्शविण्यात आली आहे.ज्या स्थानिक स्वराज्य संस्थां मध्ये एससी/एसटीची लोक संख्या ५० टक्के असेल, त्या ठिकाणी ओबीसींना आरक्षण असणार नाही. याच्या परिणामी गडचिरोली, नंदूरबार आणि पालघर जिल्हा परीषद मध्ये ओबीसी आरक्षण शून्य टक्के असणार होते.

जयंत बांठीया यांनी सर्वत्र ओबीसींना २७ टक्के आरक्षण देण्याची शिफारस केली आहे. हे आरक्षण देत असताना अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती आणि ओबीसी यांची सदस्य संख्या ५० टक्क्यांहून अधिक होऊ नये अशी अट आहे. त्यामुळे पुर्वी रद्द झालेल्या ९२ नगर परिषदा आणि नगर पंचायतीं सह ३६७ स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका घेण्याचा मार्ग मोकळा झाला होता.जयंत बांठिया यांच्या शिफारसी नुसार ज्या ठिकाणी अनुसूचित जमातींची संख्या५० टक्क्यांपेक्षा जास्त असेल, तिथे ओबीसी आरक्षण दिले जाणार नाही.मंडल आयोगाने राज्या तील ओबीसींची लोकसंख्या ५४ टक्के निश्चित केली होती.त्यानुसार महाराष्ट्रात २७ टक्के ओबीसी आरक्षण लागू करण्यात आले होते.मात्र जयंत बांठिया अहवाला नुसार ३७ टक्के ओबीसी दाखवण्यात आलेत. त्यामुळे १७ टक्के ओबीसी गेले कुठे ? असा प्रश्नही निर्माण झालाय.

**जयंत बांठिया अहवालात काय ?**

राज्याचे माजी मुख्य जयंतकुमार बांठिया यांच्या अध्यक्षते खाली ११ मार्च २०२२ रोजी तत्कालिन मविआ सरकारकडून स्थापना ७ जुलै २०२२ रोजी राज्य सरकारला अहवाल सादर राज्यात ओबीसींची लोकसंख्या ३७ टक्के २७ टक्के राजकीय आरक्षण देण्याची शिफारस प्रत्येक नगर पालिका क्षेत्रात ओबीसींचं वेगवेगळं प्रमाण एससी, एसटी आरक्षणाला धक्का न लावता आरक्षण एकूण आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा कायम अनुसूचित जमातींची लोक संख्या ५० टक्क्यां पेक्षा अधिक असेल तर ओबीसी आरक्षण नाही

**तात्कालीन माहिती कशी गोळा केली ?**

जयंत बांठिया यांनी ग्रामविकास विभागाचे सचिव,उपसचिव, विभागीय आयुक्त,विविध राजकीय पक्षांचे नेते तसेच जिल्हाधिकारी, यांच्याशी चर्चा केली. तसेच वर्तमानपत्रां मध्ये जाहिराती देऊन जनतेची मते मागवण्यात आली. त्यानंतर आयोगासमोर ६ जनसुनावण्या झाल्या.आयोगाला एकूण १५७१ निवेदने प्राप्त झाली होती.

**आधीची ओबीसी आकडेवारी**

यापूर्वी विविध आयोग आणि संस्थां मार्फत राज्यात ओबीसींची गणना करण्यात आली होती. त्यात किमान २७ टक्के तर कमाल ४० टक्के ओबीसी आढळून आले होते.

ग्रामीण भागात ओबीसींची जितकी घरे आहेत, ती संख्या ग्राह्य धरून राष्ट्रीय सांख्यिकी मध्ये ओबीसींचे प्रमाण ३९.७ टक्के दाखवण्यात आले होते. ही आकडेवारी २०१९ मधील आहे.'सरल' या संस्थेने गोळा केलेल्या आकडेवारीनुसार राज्यात ३२.९३ टक्के ओबीसी आहेत.यू डी आय एस इ आणि केंद्र सरकारने जारी केलेल्या आकडेवारीत ३३ टक्के ओबीसी दाखवण्यात आलेत.'गोखले इन्स्टीट्यूट'ने केलेल्या ओबीसींच्या गणनेमध्ये हेच प्रमाण तब्बल ४८.६ टक्के आढळून आले होते.केंद्र सरकारच्या जनकल्याण विभागाने काढलेली ओबीसींची आकडेवारी ३३.८ टक्के आहे. राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणा नुसार शहरी भागात २४.७ टक्के आणि ग्रामीण भागात २७.८ टक्के ओबीसी आहेत. निवडणूक आयोगाकडे तयार झालेल्या मतदार याद्यांनुसार राज्यात ३७ टक्के ओबीसी आहेत. सुधारणा कायदे आणि अनुकूलन आदेशांची यादी रद्द करणे आणि सुधारणा कायदा, १९४९ (१९४९ चा ४०) जनगणना (सुधारणा) कायदा, १९५० (१९५० चा ५१) अनुकूलन कायदे आदेश, १९५० कायद्यांचे अनुकूलन (क्रमांक ३) आदेश, १९५६ जनगणना (सुधारणा) कायदा, १९५९ (१९५९ चा २२).रद्द करणे आणि सुधारणा कायदा, १९७४ (१९७४ चा ५६) याचाही गांभीर्याने विचार होणे गरजेचे आहे. २०११ च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या १,२१०,८५४,९७७ होती.२००१ पासून भारताने १८१.५ दशलक्ष लोकसंख्या जोडली,जी ब्राझीलच्या लोक संख्येपेक्षा थोडी कमी आहे. जगाच्या पृष्ठभागाच्या २.४% क्षेत्रासह भारताची लोकसंख्या १७.५% आहे.२०११ ची भारताची जनगणना किंवा १५ वी भारतीय जनगणना दोन टप्प्यात करण्यात आली, घरांची यादी आणि लोकसंख्या गणना. घरांची यादी करण्याचा टप्पा १ एप्रिल २०१० रोजी सुरू झाला आणि त्यात सर्व इमारतींबद्दल माहिती गोळा करण्यात आली. पहिल्या टप्प्यात राष्ट्रीय लोकसंख्या नोंदणी (एनपीआर) ची माहिती देखील गोळा करण्यात आली, ज्याचा वापर भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरणाद्वारे सर्व नोंदणीकृत भारतीय रहिवाशांना १२-अंकी अद्वितीय ओळख क्रमांक देण्यासाठी केला जाईल. दुसरा लोकसंख्या गणना टप्पा ९ ते २८ फेब्रुवारी २०११ दरम्यान करण्यात आला. १८७२ पासून भारतात जनगणना होत आहे आणि २०११ मध्ये पहिल्यांदाच बायोमेट्रिक माहिती गोळा करण्यात आली. ३१ मार्च २०११ रोजी प्रसिद्ध झालेल्या तात्पुरत्या अहवालांनुसार, भारतीय लोकसंख्या १७.७०% च्या दशकीय वाढीसह १.२१ अब्ज झाली. प्रौढ साक्षरता दर ९.२१% च्या दशकीय वाढीसह ७४.०४% पर्यंत वाढला. जनगणनेचे ब्रीदवाक्य होते असेही त्यांनी नमूद केले.

# शिक्षकांची राज्यव्यापी आयडॉल बँक तयार करणार- शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

शालेय जिवनापासून विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासावर शासनाचा भर आहे. देशाचा उद्याचा नागरिक घडविण्यात आई-वडीलानंतर शिक्षकाची भुमिका महत्त्वाची आहे. शिक्षण आनंददायी, शिक्षण गुणवत्तापूर्ण यासोबतच शिक्षण भाकरीचे, शिक्षण राष्ट्रीयत्वाचे हे ब्रिद घेऊन शिक्षण विभाग काम करत आहे. प्रत्येक विद्यार्थी आपल्या क्षेत्रात सक्षमपणे उभा रहावा, यासाठी शिक्षकांनी झोकून देत काम करावे, शासन आपल्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. शिक्षकांची राज्यव्यापी आयडॉल बँक तयार करणार असल्याचे प्रतिपादन शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी आज केले. आयडॉल शिक्षकाने आपल्या नाविन्यपूर्ण उपक्रमाला आपल्या शाळेपुरते मर्यादित न ठेवता राज्यभर हा उपक्रम कसा पोहचेल यासाठी काम करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

देवगिरी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सभागृहात छत्रपती संभाजीनगर विभागातील आयडॉल शिक्षकांशी आयोजित संवाद कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी आमदार प्रदिप जैस्वाल, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित, विभागीय मंडळाचे अध्यक्ष अनिल साबळे, शिक्षण उपसंचालक प्रकाश मुकुंद, सहायक संचालक रविंद्र वाणी, शिक्षण उपनिरीक्षक डॉ. सतिष सातव उपस्थित होते. शिक्षण मंत्री श्री. भुसे म्हणाले, आयडॉल शिक्षकांनी राबविलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमाची शासनाकडून दखल घेण्यात येईल. आपल्यासमोर असलेल्या अडचणीतून मार्ग काढून या शिक्षकांनी नाविन्यपूर्ण उपक्रमाच्या माध्यमातून आपल्या शाळेची वेगळी ओळख निर्माण केली आहे. प्रत्येक जिल्हयाच्या शैक्षणिक विकासासाठी रोडमॅप तयार करण्यात आला आहे. येणाऱ्या कालावधीत शाळांना भौतिक सुविधेसह डिजीटल सुविधा देण्यासाठी शासन कटिबध्द आहे. शिक्षकांनी राबविलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमांना शासनाचे पूर्ण पाठबळ असल्याचे श्री भुसे यांनी सांगितले.

राज्य शासन येणाऱ्या शैक्षणिक वर्षात आठवीच्या पुढील विद्यार्थीनींना सायकलसाठी अर्थसहाय्य तसेच शालेय विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यांचे हेल्थ कार्ड तयार करणार आहे. हेल्थ कार्ड उपक्रमाच्या माध्यमातून तपासणीत गंभीर आजार आढळला तर त्या विद्यार्थ्याला शासकीय योजनेतून सर्व उपचार शासन करेल. शालेय पातळीवर पुर्वी विविध १५ समित्या कार्यरत होत्या. या समित्यांची संख्या १५ वरुन ४ समित्यांवर आणली आहे. शिक्षकावरील अशैक्षणिक कामाचा भार कमी करण्यात आला आहे. त्यामुळे शिक्षकांना शिक्षणावर अधिक लक्ष केंद्रीत करता येईल, असे श्री. भुसे म्हणाले. शालेय विद्यार्थ्यांच्या सहली शेती, कारखाना, किराणा दुकान, बँक, दवाखाना याठिकाणी सहलीचे आयोजन करण्यात येईल. बालवयात मुलांना याबाबी जाणून घेण्याची उत्कंठा असते त्यासाठी अशा सहली निश्चितपणे विद्यार्थ्यांना आनंद देतील. स्पर्धा परीक्षेच्या निकालात ५० टक्के विद्यार्थी हे जिल्हा परिषद व नगरपालिका शाळेत शिक्षण घेतलेले आहेत. ही सर्वांसाठी अभिमानाची बाब आहे. सर्व माध्यमांच्या शाळेमध्ये 'गर्जा महाराष्ट्र माझा' हे राज्य गीत बंधनकारक करण्यात आले आहे. त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देश श्री. भुसे यांनी दिले.

'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' या उपक्रमासोबतच जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी सुरु केलेला शिक्षणाचा दशसुत्री उपक्रम राबविण्यात येईल. शिक्षक, पालक संवाद उपक्रम प्रभावीपणे राबवावा लागेल. शिक्षकांना विद्यार्थ्यांबरोबरच पालकांशी देखील संवाद साधावा लागेल. यातून अनेक अडचणी सुटतील तसेच आई वडीलांनी देखली आपल्या मुलांबरोबर संवाद वाढवावा त्यातून मुलांमध्ये आत्मविश्वास वाढेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

जिल्हाधिकारी दिलीप स्वामी म्हणाले, सोलापूर येथे कार्यरत असतांना आपण लोकवर्गणीतून २६७० शाळा सुंदर केल्या आहेत. तसेच सोलापूर येथे विद्यार्थ्यांच्या 'आरोग्याचा सातबारा' या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांच्या आरोग्य तपासणीचा उपक्रम राबविला. 'शिक्षणाचा दशसुत्री उपक्रम' यशस्वीपणे राबविला. छत्रपती संभाजीनगर जिल्हयात दशसुत्री उपक्रम राबविण्यात येत असून या उपक्रमाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी शिक्षक व पालकांचे सहकार्य महत्वाीतचे आहे. गीत गुंजण हा नाविन्यपूर्ण उपक्रम सुरु करण्यात आला असून शिक्षकांसाठी पुस्तक प्रदर्शन, माजी विद्यार्थ्यांची कार्यशाळा यासारखे उपक्रम राबविण्यात येत आहेत.

ी शैक्षणिक गुणवतेसोबतच विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासावर आपला भर असल्याचे त्यांनी सांगितले. सोलापूर जिल्हयात कार्यरत असतांना शैक्षणिक विकासासोबतच विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी राबविलेल्या विविध उपक्रमाबाबत त्यांनी माहिती दिली. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अंकित यांनी आजच्या या कार्यक्रमातून निश्चितपणे शिक्षकांना प्रोत्साहन तसेच ऊर्जा मिळेल. आपले विद्यार्थी विविध क्षेत्रात पुढे जावेत. विद्यार्थ्यांमध्ये नाविण्यता यावी यासाठी अनेक शिक्षक चांगले काम करतात.

शिक्षकांच्या नाविण्यपूर्ण उपक्रमाला सर्वातोपरी सहकार्य करणार असल्याचे त्यांनी सांगितले. उपसंचालक प्रकाश मुकुंद यांनी प्रास्ताविक केले. छत्रपती संभाजीनगर विभागात राबविण्यात येत असलेल्या विविध शैक्षणिक उपक्रमाबाबत त्यांनी माहिती दिली.

**नाविण्यपूर्ण उपक्रमाबाबत सादरीकरणाद्वारे माहिती**

जालना जिल्हयातील देवीपिंपळगाव (बदनापूर) येथील कृष्णा निहाळ, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, वरवंटी तांडा ता. पैठण येथील भरत काळे, जरेवाडी ता. पाटोदा जि. बीड येथील राहुल डोंगर, सिरसम ता.गंगाखेड जि. परभणी येथील दशरथ मुंडे, सांडस ता. कळमनुरी जि.हिंगोली येथील शंकर लेकुळे तसेच परभणीचे शिक्षणाधिकारी संजय ससाणे यांनी राबविलेल्या नाविण्यपूर्ण उपक्रमाबाबत सादरीकरणाद्वारे माहिती दिली.



# शेतीच्या सुधारणांसाठी आधुनिक तंत्रज्ञानाच्या प्रभावी वापरावर भर - कृषीमंत्री ॲड माणिकराव कोकाटे

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

शाश्वत शेतीच्या वाटचालीसाठी कृषी विभाग काम करत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतील १०० दिवसांच्या कार्यक्रमांतर्गत कार्यालयीन सुधारणा मोहिमेत सर्वोत्कृष्ट कामगिरी बजावलेल्या मंत्रालयीन विभागामध्ये पहिल्या टप्प्यात कृषी विभागाने ६६.१५ टक्के गुण प्राप्त करत तिसरा क्रमांक प्राप्त केला आहे. भारतीय गुणवत्ता परिषदेकडून विभागाने केलेल्या कामांचे मुल्यांकन करण्यात आले. कृषी विभागात शेतकऱ्यांच्या समस्यांवर तातडीने उपाययोजना, नव्या योजनांची अंमलबजावणी, पारदर्शकता, नवकल्पना, आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर या बाबींवर भर दिला असल्याचे कृषीमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी सांगितले.

कृषीमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे म्हणाले की, पदभार स्वीकारल्यानंतरच्या या १०० दिवसांच्या कालावधीत शेतकरी आणि शेतीच्या विकासासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात आणि उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली काम करत आहोत. विभागीय परिसंवाद दौ-याच्या माध्यमातून शेतकऱ्यांशी संवाद साधला. पुणे येथे महाराष्ट्रातील पहिली कृषी अधिकारी व कर्मचारी कार्यशाळा यशस्वी झाली. बियाणे- खत -किटकनाशक उत्पादक कंपन्या आणि विक्रेते संघटनांसोबत गुणवत्तेची खात्री, बाजारातील उपलब्धता आणि संभाव्य समस्या यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

कृषीमंत्री ॲड. कोकाटे म्हणाले की, ॲग्रीस्टेक या (शेतकरी आयडी उपक्रम) आयडीद्वारे सर्व योजनांचा लाभ एकाच ओळखीद्वारे मिळणार आहे. यामुळे शेतकऱ्यांची खरी संख्या व माहिती अचूकपणे उपलब्ध होणार आहे तसचे राज्यात ९२ लाख शेतकरी खऊ तयार झाले आहेत त्यामुळे शेतकरी डेटाचा मजबूत आधार तयार झाला आहे. एक खिडकी सेवा उपक्रमामध्ये सर्व कृषी योजना, सेवा आणि माहिती एका प्लॅटफफॉर्मवर उपलब्ध होणार असून शेतकऱ्यांसाठी अर्ज, ट्रॅकिंग, आणि तक्रार निवारण एकाच ठिकाणी ॲप व वेब पोर्टलच्या माध्यमातून सेवा प्रदान होण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना, सूक्ष्म सिंचन योजना,कृषी यांत्रिकीकरण योजना, जमीन आरोग्य पत्रिका वितरण यासह केंद्र व राज्य शासनाच्या योजना प्रभावीपणे राबविल्या आहेत. कार्यालयीन व्यवस्थापन सुधारणा, तक्रार निवारण, कार्यालयीन बाबी आणि नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा वापर या बाबी यावर १०० दिवसात भर दिला आहे. अधिक प्रभावीपणे काम करण्याची जबाबदारी वाढली असल्याचेही कृषीमंत्री ॲड. कोकाटे यांनी सांगितले.

# मराठी भाषेचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी राज्यात लोकचळवळ उभारण्याची गरज

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

संविधानाच्या मराठी-इंग्रजी द्विभाषिक आठव्या आवृत्तीचे प्रकाशन करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले असल्याचा अभिमान आहे. तसेच मराठी भाषा व संस्कृतीचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी राज्यात लोकचळवळ उभारण्याचे आवाहन मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी केले. मराठी राजभाषा दिन, महाराष्ट्र दिन आणि कामगार दिनाच्या शुभेच्छाही श्री. सामंत यांनी दिल्या.

प्रभादेवी येथील पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी येथे मराठी भाषा विभाग व भाषा संचालनालयाच्यावतीने आयोजित कार्यक्रमात मराठी राजभाषा दिन, महाराष्ट्र दिन आणि कामगार दिनाचे औचित्य साधून मराठी भाषा मंत्री डॉ. उदय सामंत यांच्या हस्ते संविधानाच्या अनुवादित ८ व्या आवृत्तीचे प्रकाशन करण्यात आले. तसेच अभिजात मराठी (ओ टी टी मंच) बोधचिन्हाचे अनावरण करण्यात आले. यावेळी विधी व न्याय विभागाचे सचिव सतीश वाघोले यांनी 'राज्यभाषेची सद्यस्थिती - न्याय व्यवहार व मराठी' या विषयावर मार्गदर्शन केले. यावेळी मराठी भाषा विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी, भाषा सल्लागार समितीचे अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख आणि भाषा संचालक विजया डोनीकर उपस्थित होते.

मराठी भाषा मंत्री उदय सामंत म्हणाले, संविधानातील १०६ सुधारणा समाविष्ट असलेली आणि मराठी-इंग्रजी भाषांत उपलब्ध असलेली आठवी आवृत्ती महाराष्ट्राने प्रकाशित केली असून, याचा आम्हाला अभिमान आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम आणि छत्रपती शिवाजी महाराज यांची मराठी भाषा जागतिक स्तरावर नेण्यासाठी विभाग कार्यरत आहे. जगातील विविध देशात मराठीसाठी बृहन्मंडळे कार्यरत आहेत. या मंडळांनी त्या-त्या देशात मराठी शिकवण्यासाठीची जबाबदारी घ्यावी असे आवाहन श्री. सामंत यांनी यावेळी केले. यावेळी त्यांनी 'यशवंतराव चव्हाण अनुवाद अकादमी' सुरू करण्याची घोषणाही केली. तसेच, भव्य मराठी भाषा भवन उभारण्यात येत असल्याचे सांगितले.

प्रशासनात मराठी वापरावर भर

सोप्या मराठी भाषेचा शासकीय व्यवहारात अधिक वापर वाढवावा यासाठी मराठी भाषा मंत्री सामंत यांनी जिल्हाधिकाऱ्यांना सूचना दिल्या. मराठी भाषेला कमी लेखल्यास कठोर कारवाई करण्यात यावी. जिल्हास्तरावर अशासकीय सदस्यांची संख्या वाढवणे, साहित्यिकांचा सन्मान करणे, आणि महिला, तरुण व बालकांसाठी विशेष साहित्य संमेलने घेणार असल्याचेही यावेळी सामंत यांनी सांगितले.

मराठी भाषा विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी म्हणाले, राज्यातील शासकीय कार्यालयांत मराठी भाषा अधिकारी यांना प्रशिक्षण देण्यासाठीही नियोजन सुरू आहे. याशिवाय नवीन परिभाषा कोश ऑनलाइन सर्च करण्यायोग्य बनवण्याचे कामही सुरू आहे. मराठी भाषेच्या संवर्धनासाठी शासनाने उचललेली ही महत्त्वपूर्ण पावले राज्यातील जनतेला अभिमान वाटावा अशी आहेत, असेही त्यांनी सांगितले. संचालक विजया डोनीकर यांनी आभार मानले.

### महाराष्ट्र राज्य स्थापना वर्धापन दिन सोहळा उत्साहात

# शांतता अबाधित ठेवून प्रगतीकडे वाटचाल- पालकमंत्री संजय शिरसाट

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

दहशतवादाचा सक्षमतेने मुकाबला करत असतांना देशांतर्गत शांतता व लोकशाही अबाधित राखून देश आणि राज्य प्रगतीपथावर वेगाने वाटचाल करीत आहे. न्याय, समता, शांतता, बंधुता या मूलभूत तत्त्वांचा अंगीकार करत नागरिकांनी सामाजिक एकता आणि राष्ट्रप्रेम अबाधित ठेवावे, असे आवाहन राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी केले.

महाराष्ट्र राज्य स्थापना वर्धापन दिनाचा सोहळा पोलीस आयुक्तालयाच्या देवगिरी मैदानावर मोठ्या उत्साहात संपन्न झाला. पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते ध्वजारोहण करुन राष्ट्रध्वजास मानवंदना देण्यात आली.

विधान परिषदेचे विरोधी पक्ष नेता अंबादास दानवे, खा. संदिपान भुमरे, माजी खा.चंद्रकांत खैरे तसेच विभागीय आयुक्त दिलीप गावडे, छत्रपती संभाजीनगर परीक्षेत्राचे पोलीस महानिरीक्षक विरेंद्र मिश्र, मनपा आयुक्त जी. श्रीकांत, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकीत, पोलीस आयुक्त प्रवीण पवार, पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड तसेच प्रशासनातील अन्य अधिकारी, सामाजिक, राजकीय कार्यकर्ते, स्वातंत्र्य सैनिक, विद्यार्थी पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जम्मू-काश्मीरमध्ये पहेलगाम येथे दहशतवादी ह्लयात मृत्यू झालेल्या पर्यटकांना पालकमंत्री शिरसाट यांनी श्रद्धांजली अर्पण केली. त्यांच्या कुटुंबयांप्रति संवेदना व्यक्त करून पालकमंत्री शिरसाट म्हणाले की, भारत देश हा बलाढ्य आणि विकसनशील देश असून सर्व क्षेत्रात आघाडीवर आहे. जिल्ह्याची विकासाकडे अग्रेसर असून उद्योग, कृषी अशा विविध क्षेत्रांमध्ये प्रगती होत आहे.

औद्योगिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक होत असून त्यामुळे रोजगार निर्माण होणार आहे. जिल्ह्यात कामगारांना विविध योजनेत २६४ कोटी ४४ लक्ष ९३ हजार रुपयांचा लाभ देण्यात आला असून आरोग्य,आवास योजना, शिक्षण,ग्रामविकास, आरोग्य क्षेत्रातील सुधारणा यासह लघुउद्योग आणि व्यवसायासाठी जिल्ह्यामध्ये भरीव निधीची तरतूद केली आहे.

कायदा सुव्यवस्था आणि शांततेसाठीही पोलीस प्रशासनास अद्यावत वाहने उपलब्ध करून देण्यात आली आहेत. जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळत असून.

या विकास प्रक्रियेत सर्व नागरिक, प्रशासकीय अधिकारी व सर्व घटकांनी सहभागी होऊन जिल्ह्याला प्रगतीपथावर नेण्याचा संकल्प करू या, असे आवाहन श्री. शिरसाट यांनी केले.

त्यानंतर पालकमंत्री शिरसाट यांच्या हस्ते विविध प्रशासकीय कामगिरी बद्दल अधिकारी, कर्मचाऱ्यांना गौरविण्यात आले. तसेच जिल्हा परिषद अंतर्गत स्वच्छ भारत मिशन ग्रामीण यामध्ये १ मे ते १५सप्टेंबर या कालावधीत 'कंपोस्ट खड्डा भरू, आपलं गाव स्वच्छ ठेवू' या मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला.

## पुरस्कार वितरण सोहळा



**पोलीस आयुक्तालयातील पोलीस उपनिरीक्षक दिपक परदेशी यांना पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते उत्कृष्ट कामगिरी बद्दल पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.**

पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते विविध क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरी बद्दल पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. त्यांची नावे याप्रमाणे-

१. राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियान- जिल्हाधिकारी दिलीप स्वामी व उपविभागीय कार्यालय कन्नड.

२. पोलीस पदके- संदीप अनंतराव पाटोळे लाचरुत प्रतिबंधक विभाग स्वाती भोर अशोक भंडारे गीता बागवडे यांच्यासह सहायक पोलीस निरीक्षक. पोलीस हवालदार यांचाही सन्मान करण्यात आला.

३. आदर्श ग्राम महसूल अधिकारी पुरस्कार, सजा बाजारात सावंगी तालुका खुलताबाद येथील नारायण पठ्ठे.

४. संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान पुरस्कार (सन २०२३-२४) प्रथम ग्रामपंचायत पुरस्कार सोयगाव तालुक्यातील जरंडी, द्वितीय पुरस्कार कन्नड तालुक्यातील नादरपुर ग्रामपंचायत, तृतीय पुरस्कार तालुका छत्रपती संभाजी नगर मधील दुधड ग्रामपंचायत, विशेष पुरस्कार प्राप्त ग्रामपंचायत मध्ये छत्रपती संभाजी नगर मधील ग्रामपंचायत वाहेगाव वळदगाव व ग्रामपंचायत करोडी वितरित करण्यात आले.

| | |
|---|---|
| ५. पोलीस अधीक्षक संदीप अनंतराव आटोळे | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग |
| ६. पोलीस अधीक्षक श्रीमती स्वाती रामराव भोर | लोहमार्ग |
| ७. पोलीस निरीक्षक अशोक रामलू भंडारे | पोलीस आयुक्तालय |
| ८. पोलीस निरीक्षक श्रीमती गीता मोतीचंद बागवडे | पोलीस आयुक्तालय |
| ९. पोलीस निरीक्षक शरद बाबुराव जोगदंड | लोहमार्ग,पोलीस |
| १०. पोलीस उपनिरीक्षक इसाक उस्मानखान पठाण | पोलीस आयुक्तालय |
| ११. पोलीस उपनिरीक्षक दिपक परदेशी | पोलीस आयुक्तालय |
| १२. पोलीस उपनिरीक्षक मनोहर बुरुड | पोलीस आयुक्तालय |
| १३. पोलीस उपनिरीक्षक शेख हबीब खान मोहमद | पोलीस आयुक्तालय |
| १४. पोलीस उपनिरीक्षक संजय जानुजी जोगदंड | पोलीस आयुक्तालय |
| १५. सहा.पो.उपनिरीक्षक विष्णु लक्ष्मणराव उगले | पोलीस आयुक्तालय |
| १६. पोलीस हवालदार मुश्ताक गफूर शेख | पोलीस आयुक्तालय |
| १७. पोलीस हवालदार मच्छीन्द्रंनाथ रंगानाथ जाधव | पोलीस आयुक्तालय |
| १८. पोलीस हवालदार विठ्ठल विनायकराव मानकापे | पोलीस आयुक्तालय |
| १९. पोलीस हवालदार संतोष लोंढे | पोलीस आयुक्तालय |
| २०. पोलीस हवालदार शिवाजी राजाराम कचरे | पोलीस आयुक्तालय |
| २१. पोलीस हवालदार प्रभाकर साहेबराव राऊत | पोलीस आयुक्तालय |
| २२. पोलीस हवालदार कैलास तेजराव गाडेकर | पोलीस आयुक्तालय |
| २३. पोलीस हवालदार राजेंन्द्र देविदास चौधरी | पोलीस आयुक्तालय |
| २४. पोलीस हवालदार मो.इरफान मो.इसाकखान | पोलीस आयुक्तालय |
| २५. पोलीस हवालदार लक्ष्मण दशरथ किर्तीकर | पोलीस आयुक्तालय |
| २६. पोलीस हवालदार सुनिल सुरेश बेलकर | पोलीस आयुक्तालय |
| २७. पोलीस उपनिरीक्षक शाकिल अहेमद शेख रहीम शेख | ग्रामीण |
| २८. पोलीस उपनिरीक्षक गफारखान सरोवरखान पठाण | ग्रामीण |
| २९. सहा. पो.उप.निरीक्षक खालेद हबीब शेख | ग्रामीण |
| ३०. पोलीस हवालदार अफसर खाजा शेख | ग्रामीण |
| ३१. पोलीस हवालदार राजु बबनराव खरात | ग्रामीण |
| ३२. पोलीस हवालदार विश्वास प्रल्हाद नागर | रा.रा. पो. बल गट क्र.१४ छत्रपती संभाजीनगर |
| ३३. पोलीस अंमलदार अशोक परशुराम पवार | रा.रा. पो. बल गट १४ छत्रपती संभाजीनगर |
| ३४. पोलीस अंमलदार दिनेश शामराव ढगे | रा.रा. पो. बल गट क्र.१४ छत्रपती संभाजीनगर |

## पोलीस दलाच्या ताफ्यात ३३ वाहने

ध्वजारोहण समारंभ नंतर पोलीस विभागासाठी अद्यावत ३३ वाहनांचे लोकार्पण पालकमंत्री शिरसाट यांच्या हस्ते करण्यात आले. त्यात चारचाकी वाहने, बसेस, दुचाकी वाहने यांचा समावेश असुन गतिमान तपास यंत्रणा व कायदा सुव्यवस्था राखण्यामध्ये या वाहनांचा उपयोग होईल असा विश्वास पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांनी व्यक्त केला. पोलीस दलातील विविध पथकांचे मानवंदना स्वीकारून नंतर पालकमंत्र्यांनी उपस्थित स्वातंत्र्य सैनिक, लोकप्रतिनिधी आदी मान्यवरांची भेट घेऊन त्यांना शुभेच्छा दिल्या.

## पालकमंत्र्यांच्या हस्ते संविधान उद्देशिका कोनशिलेचे अनावरण



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

'घर घर संविधान' अभियानाचा उपक्रम म्हणून जिल्हाधिकारी कार्यालयात संविधान उद्देशिकेच्य कोनशिलेचे अनावरण आज राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते करण्यात आले. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या तळमजल्यावर प्रवेशद्वारा जवळ ही उद्देशिकेची कोनशिला स्थापित करण्यात आली आहे. विधान परिषद सदस्य आ.संजय केनेकर, विभागीय आयुक्त दिलीप गावडे, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर, उपजिल्हाधिकारी उमाकांत पारधी, एकनाथ बंगाळे, जिल्हा नियोजन अधिकारी भारत वायाळ, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दयानंद मोतीपवळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अभय धानोरकर यांची यावेळी उपस्थिती होती.

पान १ वरून

## सृजनशीलतेत चैतन्य निर्माण करण्याची क्षमता - पंतप्रधान नरेंद्र मोदी

ठेवण्याची महत्त्वाची भूमिका सृजनशीलता पार पडत असते. संगणकावर आपल्या बोटांचा वापर करणारा संगणक अभियंता थकतो तर त्याचवेळी एखादा वयोवृद्ध सतारवादक त्या संगणक अभियंत्याच्या तुलनेत जास्त प्रसन्न, उल्हासित राहतो. हा फरक सृजनशीलतेमुळे पहावयास मिळतो. त्यामुळे प्रत्येकाने आपल्यातील कला, सृजनशीलतेला प्रोत्साहन देत जोपासली पाहिजे. भारत सर्व क्षेत्रात जागतिक स्तरावर आपला ठसा उमटवत आहे. त्याच धर्तीवर सृजनशीलतेच्या क्षेत्रात 'वेव्हज'च्या माध्यमातून पुढे आलेल्या नाविन्यपूर्ण संकल्पना यशाचा मोठा पल्ला गाठतील,असे सांगून प्रधानमंत्री मोदी यांनी या स्पर्धेतील सर्व विजेत्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. तत्पूर्वी प्रधानमंत्री मोदी यांनी 'क्रिएट इन इंडिया चॅलेंज'म धील विजेत्यांच्या दालनांना भेट देऊन त्यांच्या संकल्पनांची माहिती घेतली.

## मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय जिल्हास्तरीय मदत कक्षाचे पालकमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**



मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालयांमार्फत नागरिकांना द्यावयाच्या मदतीसाठी कार्य करणाऱ्या जिल्हास्तरीय मदत कक्षाचे आज राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

जिल्हाधिकारी कार्यालयात हा कार्यक्रम पार पडला. जिल्हाधिकारी कार्यालयातच तळ मजल्यावर हा कक्ष कार्यान्वित करण्यात आला आहे. विधान परिषद सदस्य आ.संजय केनेकर, विभागीय आयुक्त दिलीप गावडे, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर, उपजिल्हाधिकारी उमाकांत पारधी, एकनाथ बंगाळे, जिल्हा नियोजन अधिकारी भारत वायाळ, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दयानंद मोतिपवळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर यांची उपस्थिती होती.

मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचा हा महत्वाकांक्षी प्रकल्प असून कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली या कक्षाचे कामकाज होईल.

राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील जिल्हाधिकारी कार्यालयात, जिल्हास्तरीय मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

या कक्षाद्वारे रुग्णांना वैद्यकीय उपचारकरिता अर्थसहाय्य सहज उपलब्ध व्हावे, नागरिकांना मुख्यमंत्री सहायता निधीच्या प्रकरणाची माहिती आपल्याच जिल्ह्यात व्हावी तसेच नागरिकांच्या पैशाचा व वेळाचा अपव्यव टाळण्याकरिता हा कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

तसेच नैसर्गिक आपत्ती, दहशवादी हल्ला, दंगल इ मध्ये मृत किंवा दुखापत झालेल्या व्यक्तींना किंवा त्यांच्या वारसांना आर्थिक किंवा अन्य मदत कक्षाच्या माध्यमातून केली जाणार आहे. या कक्षाद्वारे रुग्णांसाठी केंद्र व राज्य शासनाच्या इतर आरोग्यविषयक योजनांची माहिती दिली जाणार आहे. तसेच वेळोवेळी आरोग्य शिबीरे घेऊन केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजना सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचवल्या जाणार आहेत. छत्रपती संभाजीनगर येथील कक्षात वैद्यकीय अधिकारी डॉ. बालाजी गोरे, लिपिक सचिन दोडे, सम ाजसेवा अधीक्षक श्यामसुंदर वाकळे या तीन कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली आहे.

## या धर्तीवर जे नंदनवन आहे ते काम गारांच्या हाता मुळे तो साबुत राहिल तर वैभवात भर पडेल - प्रा.दुपारे



**नागपूर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

हि धरती कोणाच्या हातावर तरत असेल तर ती फक्त कामगार कष्टकरी यांच्या हातावर या धर्तीच्या खरा निर्माताच नाही तर खरे नंदनवन घडवणारे हात हे कामगारांचे आहेतः ते हात साबुत राहिल तर या धरतीचे वैभव कायम राहील, असे प्रतिपादन आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चाचे शहराध्यक्ष प्रा. रमेश दुपारे यांनी केले ते आज जागतिक कामगार दिवस आणि महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी पुरातत्व अधिक्षक आणि आंरिमो चे प्रदेश उपाध्यक्ष नामदेवराव निकोसे हे होते तर प्रमुख उपस्थितीत ओबीसी नेते राजू पांजरे, मामासाहेब मेश्राम, रोहीत पांडे, जयदेव चिंवडे हे होते.

नामदेवराव निकोसे यांनी सांगितले की आम्ही जेव्हा पुरातत्व खात्याचे काम करित असता जो अनुभव आला धरती वर जितके सौंदर्य आहे त्याही पेक्षा उत्खननात आम्हाला सौंदर्याचा साठा सापडला किती नक्शी काम पाहून या कामगारांनी धरती वर आणि बुरुजावर कौशल्य निर्माण करून चार चांदणे पांघरले हे कामगाराशिवाय शक्य नाही.

मामासाहेब मेश्राम यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले तर राजु दादा पांजरे यांनी दिपप्रज्वलन केले या प्रसंगी अभिषेक मिश्रा, अतुल गंगापूरकर, चरणदास गायकवाड,राजु कांबळे.रामभाऊ वाहने, उपस्थित होते.

पान १ वरून

## बारावीचा निकाल १३ किंवा १४ मे रोजी, तर दहावीचा निकाल १६ मे पूर्वी जाहीर होणार

होईल. बारावीचा निकाल १३ किंवा १४ मे तर, दहावीचा निकाल १५ किंवा १६ मे रोजी जाहीर होईल. यासंदर्भातील घोषणा शिक्षणमंत्री लवकरच करतील, असं पुणे विभागीय मंडळाचे अध्यक्ष औदुंबर उकिरडे म्हणाले.

सीआयएससीई, आयसीएसई, आयएससीचा निकाल जाहीर

कौन्सिल फॉर द इंडियन स्कूल सर्टिफिकेशनने बुधवारी आयसीएसई (खउडए) दहावी आणि आयएससी (खडउ) बारावी २०२५ परीक्षेचा निकाल जाहीर केला. बारावी आयएससी परीक्षा १३ फ ेब्रुवारी ते ५ एप्रिल दरम्यान आणि दहावी आयसीएसई परीक्षा १८ फेब्रुवारी ते २७ मार्च दरम्यान घेण्यात आली होती. दहावीचा निकाल ९९.०९ टक्के लागला आहे. दहावीत मुली आणि मुलांच्या उत्तीर्णतेचे अनुक्रमे ९९.३७ टक्के आणि ९८.८४ टक्के एवढे आहे. आयएससी बारावीत मुलींच्या उत्तीर्णतेचे प्रमाण मुलांपेक्षा अधिक आहे. मुलांच्या उत्तीर्णतेचे प्रमाण ९८.६४ टक्के एवढे आहे. तर मुलींचे उत्तीर्णतेचे प्रमाण ९९.४५ टक्के आहे. एकूण ९९,५५१ विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिला होती. त्यातील ९८,५७८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक , प्रकाशक - श्री. **रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५ ए , सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर , सिडको, औरंगाबाद (महा.) - ४३१००५ येथे छापून शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७, सिडको पोलीस स्टेशन जवळ, औरंगाबाद (महा.)- ४३१००३ येथे प्रसिध्द केले.

• **संपादक : रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • **RNI No. MAHMAR/2023/87816**

This Daily Printed, Published and Owned by **RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** Printed at Mansi Printers, Plot No. 45 A, Service Industry Sector, Aurangabad (M.S.)- 431005 and Published at Shop No. 3, Keshardeep Complex, N-7, Near Cidco Police Station, Aurangabad (M.S.)- 431003

• **Editor : RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • **RNI No. MAHMAR/2023/87816**